# पंडित दीनदयाळ उपाध्याय

(दि.२५ सप्टेंबर, १९१६-११ फेब्रुवारी, १९६८)

(अल्प परिचय)

जनसंघाचे अर्ध्वयू, कुशल संघटक आणि थोर विचारवंत. त्यांचा जन्म मथुरा, उत्तर प्रदेश येथे झाला. "पंडितजी" या नावाने ते सर्वपरिचित होते. कानपूरच्या एस्.डी. कॉलेजमधून ते गणित विषय घेऊन प्रथम वर्गात बी.ए. झाले; तर अलाहाबादहून ते बी.टी. झाले. त्यांचे सर्व शिक्षण शिष्यवृत्तीवर झाले.

भाऊराव देवरस यांच्यामुळेच पंडितजींचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आला. वेदमूर्ती पंडित श्रीपाद सातवळेकर यांच्या साक्षीने पंडितजींनी संघाची प्रतिज्ञा घेतली. सन १९४२ मध्ये लखिमपूर जिल्हा प्रचारक या नात्याने त्यांनी आपल्या प्रचारकी जीवनाला प्रारंभ केला. दि. २१ ऑक्टोबर, १९५१ रोजी "भारतीय जनसंघा"च्या स्थापनेची अधिकृत घोषणा करण्यात आली. या पक्षाचे पहिले अखिल भारतीय अधिवेशन कानपूर येथे डिसेंबर, १९५२ मध्ये झाले. त्याप्रसंगी जनसंघाचे अखिल भारतीय महामंत्री म्हणून पंडित दीनदयालजींचे नाव घोषित करण्यात आले.

पंडितजींचा मूळ पिंड संघ प्रचारकाचाच होता. राजकारणाविषयी मनातून उबग असूनही त्यांनी त्यांना दिले गेलेले कार्य सुव्यवस्थित रीतीने, शास्त्रीय पद्धतीने, पूर्ण मन लावून व सर्व शक्ती पणाला लावून केले. सन १९६७ साली ते जनसंघाचे अध्यक्षही झाले. अखिल भारतीय स्तरावरील जबाबदारी त्यांच्याकडे आल्यावर त्यांच्या व्यावहारिक अनुभवाचे व घनिष्ठ वैयक्तिक संबंधांचे क्षेत्र अधिकाधिक विस्तृत होत गेले. पंडितजींचा सर्वात महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा संबंध सरसंघचालक गोळवळकर गुरुजींशी होता. दोघांच्याही विचारात एकता होती. इतकेच नव्हे तर त्यांच्या अभिव्यक्ती विषयीचे धोरणही समान होते. त्याचबरोबर लोकांच्या स्तरावर येऊन त्यांना समजेल अशा भाषेत विषय मांडणे, हे पंडितजींचे वैशिष्ट्य होते. कठीण विषय सोप्या शब्दात मांडण्याची कला त्यांच्याजवळ होती. ते उत्तम लोकशिक्षक होते.

वयाच्या अवघ्या बावन्नाव्या वर्षी पंडितजींना गूढ मृत्यू आला. त्यांचा मृतदेह मोगलसराय स्टेशनवर सापडला. त्यांच्या मृत्यूचे कोडे शेवटपर्यंत उलगडले नाही.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)